महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग. जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-29921 www.gmcalibag.in/gmch

जा.क्र. शावैमअ/दरपत्रक मागणी/AIO Computer I-3 & Laptop I-5/ ४९३ /२०२५ दि. १३/०२ /२०२५

दरपत्रक मागणी पत्र

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड संस्थेकरीता All in one Computers I 3 व Laptop I 5 खरेदी करण्याकरीता दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत.

अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासुन सुरु करण्यास शासनाने व राष्ट्रीय आयुविज्ञान आयोग नवी दिल्ली, यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने संस्थेतील विविध वैद्यकीय विभाग व प्रशासकीय कार्यालयाकरीता सदर वैद्यकीय शिक्षण संस्थेस All in one Computers I-3 व Laptop I- 5 खालील प्रमाणे साधनसामुग्रीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Particulars | Specifications | Quantity | Unit Price (Including all taxes) | Amount in word |
|---|---|---|---|---|---|
| 1. | All in one Computers I-3 | As per attached – Annex 1 | 1 No | | |
| 2. | Laptop I-5 | As per attached – Annex 2 | 1 No | | |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा , दि. २०/०२/2025 रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग. जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग संस्थेकरीता All in one Computers I-3 व Laptop I- 5 पुरवठा करिता व उक्त संदर्भ, दिनांक दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. लिफाफ्यावर डाव्या बाजूस दरपत्रक, लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर ह बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

५. सदर साधनसामूग्री करीता हमी कालावधी ३ वर्षाकरीता राहिल. हमी कालावधीत मोफत सुटे भाग पुरविणे, दुरुस्ती इ. करणे बंधनकारक आहे.

६. साधनसामूग्रीचा हमी कालावधी संपुष्टात आल्यावर पुढील ७ वर्षाकरीता सर्वसामावेशक देखभाल करार करणे

Scanned with CamScanner

व सेवा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

७. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८. दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents) अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ३)जी.एस.टी.क्रमांक पत्र.

९. सदर उपकरण इतर कोणत्या ही शासकीय संस्थेत पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असलयास प्राधान्य.

10. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्र धारकास आवश्यकतेनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग संस्थेकरीता All in one Computers I-3 व Laptop I-पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

११. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकारी संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१२. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयकेही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत.

१३. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क अदा केले जाणार नाही.

१४. वरील नमुद वस्तुंची नग संख्या ही मा. अधिष्ठाता यांच्या आदेशान्वये/प्रशासकीय उपलब्धतेनुसार कमी किंवा वाढवली जाऊ शकते.

१५. पुरवठाधारकाचे पुर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, संकेतांक क्र. ( Email address along with Website) हा Envelope वर नमुद असणे आवश्यक आहे.

१६. दरपत्रका सोबत जोडण्यात आलेला संलग्न क्र.३ अदाता नोंदणी फार्म भरुन देणे अनिवार्य असून सोबत पॅन कार्ड, आधार कार्ड व रद्द धनादेश इ. कागदपत्रांच्या छायांकीत प्रती सादर करण्यात याव्यात.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग रायगड,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड़ तसेच जिल्हा रुग्यालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपात्रक मागविण्या संदर्भात दिनांक :-१३/०२/२०२५ सुचना देण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner